Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# AJANTA



Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतातील ग्रामीण दारिद्र्य : एक अभ्यास<br>**प्रा. डी. पी. कांबळे** | १-३ |
| २ | विमुद्रीकरण : स्वरूप परिणाम<br>**प्रा. डॉ. सुभाष रा. गुर्जर** | ४-७ |
| ३ | महाराष्ट्रातील शेती उत्पन्नातील प्रादेशिक विषमता<br>**माधव शिंदे** | ८-१४ |
| ४ | नवीन आर्थिक धोरण<br>**डॉ. ढास डी. के.** | १५-१९ |
| ५ | भारताचा कृषी व्यापार<br>**प्रा. डॉ. शिवाजी पाते** | २०-२४ |
| ६ | भारतीय कृषी विकासामध्ये आधुनिक सिंचन पद्धतीचे महत्व<br>**प्रा. डॉ. मदन राधाकिसन शिंदे** | २५-३१ |
| ७ | विकास सेवा संस्था आणि विविध अभ्यास गट<br>**डॉ. मधुरा कुलकर्णी** | ३२-३६ |
| ८ | नवीन आर्थिक धोरण<br>**प्रा. डॉ. नीता तिवारी** | ३७-४१ |
| ९ | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. चंद्रशेखर पुं. फरकाडे** | ४२-४५ |
| १० | भारतीय शेतकऱ्यांची आत्महत्या - एक आर्थिक चिंतन<br>**डॉ. संगीता टक्कामोरे** | ४६-४९ |
| ११ | भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील सेवा क्षेत्राची भूमिका<br>**डॉ. वाल्मिक दगडू परहर** | ५०-५३ |
| १२ | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी उद्योगाची भुमिका<br>**प्रा. डॉ. एन. एन. धोंडगे**<br>**प्रा. डॉ. व्हि. डी. पाटील** | ५४-५८ |
| १३ | भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी<br>**प्रा. हर्षद अरविंद एकबोटे** | ५९-६२ |
| १४ | भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्र्याची समस्या<br>**प्रा. शेळके सी. एस.** | ६३-६७ |
| १५ | भारतीय अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवा कराची अंतिम मर्यादा आणि पुरोगामीत्व<br>**प्रा. रविंद्र बा. शेंडे** | ६८-७१ |
| १६ | भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणानंतर शहरीकरणाच्या संधी व आव्हाने<br>**पंकज मा. तायडे** | ७२-७८ |

# १३. भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी

**प्रा. हर्षद अरविंद एकबोटे**
वाणिज्य विभाग, डॉ. एच. एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर, जि. अकोला.

प्रस्तावना

नोटबंदी म्हणजे चलनामध्ये असलेली मुद्रा रद्द करुन त्याऐवजी नविन मुद्रा चलनामध्ये प्रस्थापित करणे होय. या निर्णयामुळे काही नोटा या चलनातून बाद होतात व त्यांचे मूल्य शून्य होते. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अशीच नोटबंदीची ऐतिहासिक घोषणा केली. या घोषणेनुसार रिझर्व बॅकेच्या शिफारसीने सरकारने ५०० रु व १००० रु. च्या नोटा चलनातून बाद केल्या. म्हणजे त्याच दिवशी रात्री १२.०० वा. नंतर या नोटांचे मूल्य शून्य झाले. सरकारच्या मते भ्रष्टाचाराला आळा घालणे, अर्थव्यवस्थेतील काळया पैशाचे उच्चाटन करणे, करचुकवेगिरीला आळा घालणे हा या निर्णयामागील उद्देश होता. या निर्णयाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम झाला. भारतामध्ये नोटबंदीचा निर्णय प्रथमच झाला असे नाही. सर्वप्रथम १९४६ मध्ये ५०० रु., १००० रु. व १०,००० रु. च्या चलनातून बाद करण्यात आल्या. तसेच १९७८ साली मोरारजी देसाई पंतप्रधान असतांना १००० रु., ५००० रु. व १०,००० रु. च्या नोटा चलनातून बाद केल्या होत्या. नोटबंदीचा हा प्रयोग यापूर्वी घाना, नायजेरिया व सोव्हिएट संघ या देशांमध्ये करण्यात आला.

## भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

### १) काळा पैसा व भ्रष्टाचार

नोटबंदीचा मुख्य उद्देश काळया पैशाला आळा घालणे व भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणे हा होता. काही अहवालानुसार मोठया प्रमाणावर काळा पैसा जन–धन खात्यांमध्ये जमा करुन पांढरा करण्यात आला. काही काळा पैसा गरीब व्यापारी तसेच नातेवाईकांच्या खात्यामध्ये जमा करुन पांढरा करण्यात आला. काही लोकांनी मोठया प्रमाणावर सोने व दागदागिने खरेदी करुन काळा पैसा मोकळा केला. एकूण १५ लाख कोटी रु. च्या ५०० व १००० रु. च्या नोटा चलनातून बाद केल्या. पण त्यापैकी ९९: म्हणजेच १४.९५ लाख कोटी रु. च्या नोटा पुन्हा बॅक खात्यात जमा करण्यात आल्या. नोटबंदीच्या काळात ३ लाख मंडळापैकी २.३ लाख मंडळांची मान्यता रद्द करण्यात आली व त्यांची बॅक खाती सील करण्यात आली. सरकारी आकडेवारीनुसार २०१७ जानेवारी पर्यंत १७ लाख मंडळांची नोंदणी झाली होती. परंतु २०१७ अखेरपर्यंत त्यापैकी फक्त ११.५० लाख मंडळेच अस्तित्वात होती. लोकांनी स्वेच्छेने १५,००० कोटी रु. चे लपवलेले उत्पन्न जाहीर केले तर आयकर विभागाने २०१५–१६ या आर्थिक वर्षापेक्षा दुप्पट काळा पैसा (लपवलेले उत्पन्न) जप्त केला. म्हणजेच लोकांनी स्वेच्छेने घोषीत केलेले उत्पन्न व आयकर विभागने जप्त केलेले उत्पन्न मिळून २९००० कोटी रु. परत आले जे संशयित व्यवहारांच्या १८: होते.

**२) दहशतवादी कारवाया**

जम्मू व काश्मीर राज्य तसेच छत्तीसगढच्या काही नक्षली भागांमध्ये मोठया प्रमाणावर दहशतवादी कारवाया अनेक वर्षापासून सुरु आहेत. सरकारच्या मते या कृत्यांमध्ये मोठया प्रमाणावर ५०० व १००० रु. च्या नोटांचा वापर केला जातो. या दहशतवादी कारवायांना आळा घालणे हा सुध्दा नोटबंदीचा उद्देश होता. नोटबंदीच्या काळात या कारवायांचे प्रमाण कमी झाले. परंतु नोटबंदीमुळेच हा परिणाम घडून आला असे निश्चितपणे सांगता येत नासही.

**३) नकली नोटा**

नोटबंदी पूर्वीच्या काळात ५०० रु. च्या नकली नोटा मोठया प्रमाणावर चलनामध्ये अस्तित्वात होत्या. या नकली नोटा हुबेहुब असली नोटांसारख्याच दिसत होत्या. या नकली नोटांचा अर्थव्यवस्थेमध्ये मोठया प्रमाणावर सुळसुळाट होता. या नकली नोटांचे मोठे आव्हान सरकार व रिझर्व्ह बॅंकेपुढे होते. या नकली नोटांचा प्रभाव रोखणे हा सुध्दा नोटबंदीचा उद्देश होता. सरकारने ज्या नविन ५०० व २००० रु. च्या नोटा चलनात आणल्या त्या अत्यंत सुरक्षित असल्याचा सरकारचा दावा आहे आणि हा दावा मोठया प्रमाणावर खरा ठरला कारण नोटबंदीच्या २ वर्षानंतर ५०० रु. व २००० रु. च्या नकुली नोटा फारखा आढळल्या नाहीत.

**४) कल संकलन**

भारतामध्ये सकल घरेलू उत्पादनाचे कराशी प्रमाण १६: असून इतर विकसनशील देशांच्या तुलनेत ते अत्यंत कमी आहे. नोटबंदीनंतर हे प्रमाण वाढले असून नवीन ५६ लाख आयकर दाते निर्माण झाले आहेत. २०१७—१८ या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कर संकलनामध्ये १५: वाढ झाली आहे. त्यामुळे नोटबंदीमुळे प्रत्यक्ष कराच्या स्वरुपात सरकारकडे मोठया प्रमाणावर उत्पन्न जमा झाले असून त्याचा उपयोग पायाभूत सुविधा व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी करता येईल.

**५) रोखविरहीत व्यवहार**

नोटबंदीमुळे रोख रकमेची कमतरता निर्माण झाली. परंतु अनेक कारणांसाठी रोख शोधन तर करावेच लागते. त्यामुळे या काळात रोखविरहीत व्यवहारांची संख्या मोठया प्रमाणात वाढली असून त्याचा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम दिसून आला. भारत सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अहवालानुसार नोटबंदीनंतरच्या ९ महिन्यात ११३ कोटी रु. चे रोखविरहीत व्यवहार घडून आले. म्हणजेच यामध्ये ६०: वाढ घडून आली. आधार कार्ड आधारीत व्यवहारांची संख्या २.५ कोटी रु. पासून ५ कोटी रु. पर्यंत वाढली. तसेच नोटबंदीमुळे ई—कॉमर्समध्ये मोठया प्रमाणावर क्रांती घडून आली. ॲमेझॉन व फ्लिपकार्ट यासारख्या बेबवाईटवरुन करोडो रु. चे व्यवहार लोक करीत आहेत.

**रोखविरहीत व्यवहारांची संख्या (कोटी रु.)**

| स्त्रोत | ऑक्टो. २०१६ | जुलै २०१७ |
|---|---|---|
| युपीएल, भीम ॲप | ०.०१ | २०.४८ |
| रुपे कार्ड | ०.६२ | ३.०१ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

| | | |
|---|---|---|
| डेबीट कार्ड | १२.८८ | २०.९८ |
| क्रेडीट कार्ड | ८.९८ | ११.०८ |
| मोबाईल व्यवहार | ९.९६ | २३.५५ |

वरील आलेखावरुन रोखविरहीत व्यवहारांमध्ये नोटबंदीनंतर किती झपाटयाने वाढ झाली याची कल्पना येते.

**६)कृषी क्षेत्र**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे. जवळपास ५०: लोकांचा रोजगार या क्षेत्रावर आधारित आहे तर भारताच्या निर्यातीमध्ये या क्षेत्राचा वाटा २०: आहे. कृषी क्षेत्रातील सर्व व्यवहार हे रोख व्यवहार असतात. नोटबंदीचा या क्षेत्रावर विपरीत परिणाम झाला. कृषी क्षेत्रामध्ये २०११—१२ पासून शाश्वत विकास दर दिसत होता. तो २०१५—१६ पर्यंत हळूहळू पण निश्चितपणे वाढत होता. पण नोटबंदीनंतर हा विकास दर खाली आला. २०१६—१७ च्या प्रथम तिमाहीत हा विकास दर २.३: होता. पण नोटबंदीनंतर म्हणजेच नोव्हेंबर २०१६ नंतर हा विकास दर १.७: पर्यंत खाली आला.

**७) GDP विकास दर**

भारताच्या ळक्च चा विकास दर हा २०११—१२ मध्ये ७: होता. हाच विकास दर २०१४—१५ मध्ये ७.५: इतका झाला. २०१५—१६ मध्ये हाच विकास दर ८: पर्यंत पोचला. परंतु २०१६—१७ मध्ये मात्र हा विकास दर ७.१: पर्यंत खाली आला. तर २०१७—१८ मध्ये हा विकास दर ६०३: पर्यंत खाली आला. म्हणजेच नोटबंदीनंतर GDP मध्ये विकास दर घसरला असेच म्हणावे लागेल.

**८) औद्योगिक क्षेत्र**

भारताच्या अर्थव्यवस्थेत औद्योगिक क्षेत्राला महत्वाचे स्थान आहे. देशाच्या उत्पादन, रोजगार व निर्यातीमध्ये औद्योगिक क्षेत्राला अत्यंत महत्व असते. २०१५—१६ मध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास दर ८.८: होता. जो २०१६—१७ मध्ये ५.६: इतका खाली आला. बांधकाम उद्योगाचा विकास दर हा ५: होता पण नोटबंदीनंतर तो १.७: पर्यंत खाली आला. खाण उद्योगाचा विकास दर १०.५: वरुन २: वर आला. याचाच अर्थ नोटबंदीचा सर्वात मोठा फटका औद्योगिक क्षेत्राला बसला.

**९) सेवा क्षेत्र**

भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्याचे कार्य सेवा क्षेत्र करीत असते. या क्षेत्रामध्ये एकूण रोजगारांपैकी २८: रोजगार संधी निर्माण होतात. २०१६—१७ च्या आर्थिक सर्व्हेक्षणानुसार एकूण निर्यातीपैकी ३७.९: निर्यात सेवा क्षेत्रातून केली जाते. २०१६ पर्यंत या क्षेत्रामध्ये साधारणपणे दरवर्षी ९ ते १०: विकास दर साध्य केला जात होता. पण नोटबंदीनंतर हा विकास दर ७.७: पर्यंत खाली आला. नोटबंदीमुळे व्यापार, पर्यटन, वाहतूक, संदेशवहन या क्षेत्रांना उतरती कळा लागली. नोटबंदीचा सर्वात मोठा फटका सेवा क्षेत्रालाच बसला. विशेषतः पर्यटन उद्योग व हॉटेल उद्योगांचे नोटबंदीमुळे मोठेच नुकसान झाले.

१०) मुद्रास्फिती

नोटबंदीचा मुद्रास्फितीवर सुध्दा विपरीत परिणाम घडून आला. अन्नपदार्थांचा महागाईवर २.२६: होता तो नोटबंदीनंतर ४.४१: झाला. पान, सुपारी व तंबाखू यासारख्या पदार्थांचा महागाई दर ६.९: वरुन ७.७५: पर्यंत पोचला. कापड व चामडे उद्योगातील वस्तुंचा महागाई दर ४.७: वरुन ५.२: पर्यंत पोचला. गृहनिर्माण क्षेत्रातसुध्दा हा दर ६.६: वरुन ७.५: वर पोहोचला.

११) रोजगार

भारताची लोकसंख्या प्रचंड आहे. त्यामुळे रोजगार संधीची कमतरता ही प्रत्येक सरकारपुढे [illegible] डोकेदुखी ठरते. आधीच बेकारी मोठया प्रमाणावर अस्तित्वात असतांना दरवर्षी हजारो उमेदवार रोजगार शोधण्यासाठी वणवण भटकतात. नोटबंदीमुळे ग्राहकांची मागणी कमी झाली. याचा परिणाम म्हणून औद्योगिक उत्पादन कमी झाले. त्यामुळे रोजगार संधीची कमतरता निर्माण झाली. नवीन रोजगार संधी तर निर्माण झाल्या नाही उलट जानेवारी २०१७ ते एप्रिल २०१७ या काळात १५ लाख लोकांचा रोजगार गेला.

१२) सायबर गुन्हे

नोटबंदीनंतर रोखविरहीत ऑनलाईन व्यवहारांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली. रोख रकमेची कमतरता असल्यामुळे शोधन करण्यासाठी याच मार्गाचा अलवंब करण्यात आला. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत [illegible] मार्ग सुलभ होता. पण याला दुसरी बाजूसुध्दा होती. सायबर गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली. २०१[illegible] मध्ये या गुन्हयांची संख्या ५६० इतकी नोंदली गेली होती. ही संख्या २०१६ मध्ये ६३९ पर्यंत वाढली २०१७ मध्ये ही संख्या १८०३ एवढी प्रचंड वाढली. सायबर गुन्हयांमध्ये ही वाढ उत्तरोत्तर वाढत अस[illegible] यावर नियंत्रण मिळवणे ही सरकारपुढील मोठीच डोकेदुखी आहे.

**निष्कर्ष**

रिझर्व्ह बॅंकेच्या शिफारशीनुसार सरकारने नोटबंदीचा निर्णय घेतला. या निर्णयामागे सरकारचा निश्चित[illegible] चांगला हेतू होता. काळया पैशावर नियंत्रण ठेवणे व भ्रष्टाचाराला आळा घालणे हा सरकारचा शुध्द हेतू होता या निर्णयाचा अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांवर निश्चितच सकारात्मक परिणाम झाला. पण अनेक क्षेत्रांवर याचा नकारात्मक परिणाम घडून आला. ढोबळ मानाने विचार केल्यास हा निर्णय फारसा यशस्वी झाला असे आपल्याला म्हणता येणार नाही. आज नोटबंदीनंतर २ वर्षे उलटली आहेत. परंतु देशाची अर्थव्यवस्था अजूनही पुरती सावरली नाही असेच आपल्याला म्हणावे लागेल.

**संदर्भ**

1. Demonetization: Effects on Indian Economy - Dimpal Vij
2. दैनिक हिंदुस्थान टाईम्स, ईकॉनॉमिक टाईम्स व लोकसत्तामधील विविध लेख.
3. इंडिया टुडे मधील विविध लेख.